**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे विभागीय मंडळ, पुणे ४११००५**

**परिपत्रक क्र.पुविमं/लेखा-१-२/नोंदणी शुल्क/सन २०२३-२४/ पुणे दिनांक १२/०७/२०२३** |3904

**विषय- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठीचे नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क भरणेबाबत . . .**

**संदर्भ - पुविमं/लेखा-१-२/नोंदणी शुल्क/सन २०२३-२४/२९२० पुणे दिनांक १३/०६/२०२३**

पुणे विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील पुणे/अहमदनगर/सोलापूर जिल्ह्यातील सर्व मंडळ मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा / कनिष्ठ महाविद्यालय प्रमुखांना या परिपत्रकाव्दारे कळविण्यात येते की, सन **२०२३-२४** या शैक्षणिक वर्षाचे नोंदणी शुल्क खाली नमूद केल्याप्रमाणे इ. १० वी / इ. १२ वी च्या नियमित विदयार्थी संख्येप्रमाणे दिनांक **१० ऑगस्ट २०२३** पूर्वी या विभागीय मंडळाकडे मंडळाने नेमून दिलेल्या खालील बँक खात्यामध्ये दोन स्वतंत्र चलनाव्दारे जमा करण्यात यावे, असे संदर्भाधीन पत्रान्वये कळविण्यात आलेले होते. परंतु राज्य मंडळ कार्यालयाकडून प्राप्त सुधारित आदेशानुसार कळविण्यात येते की, शिक्षण संक्रमण वर्गणीची रक्कम HDFC बँकेत न भरता प्रचलित पध्दतीनुसार बँक ऑफ इंडीयाच्या खात्यात खालील तपशीलाचा वापर करून चलनाद्वारे भरण्यात यावी.

**अ) नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क भरणेसाठी खालील बॅंक खाते क्रमांक वापरावा**

| EXAM | BANK NAME | ACCOUNT NUMBER | I F S CODE |
|---|---|---|---|
| SSC | BANK OF INDIA | 051710110005059 | BKID0000517 |
| HSC | | 051710110005058 | |

## नोंदणी शुल्क दर तक्ता

| निर्धारीत दिनांक | तपशील | नोंदणी शुल्क दर | |
|---|---|---|---|
| | | इयत्ता १० वी माध्यमिक शाळा | इयत्ता १२ वी कनिष्ठ महाविद्यालय |
| दि. १० ऑगस्ट, २०२३ पर्यंत | १ ते १०० विदयार्थ्यांकरिता | रुपये १०००/- | रुपये १०००/- |
| | त्यापुढील प्रत्येक १०० विदयार्थ्यांसाठी | रुपये २००/- | रुपये ४००/- |
| दि. ११ ऑगस्ट ते ३१ ऑगस्ट, २०२३ | दंडात्मक शुल्क | रुपये २००/- | रुपये २००/- |
| दि. ०१ सप्टेबर ते ३० सप्टेबर, २०२३ | | रुपये ३००/- | रुपये ३००/- |
| दि. ०१ ऑक्टोबर नंतर नियमित विदयार्थ्यांची आवेदनपत्र स्विकारण्याच्या तारखेपर्यंत | | रुपये ५००/- | रुपये ५००/- |

**विशेष सूचना - प्रचलित पध्दतीनुसार नोंदणी शुल्क व शिक्षण संक्रमण शुल्क यासाठी बॅंक ऑफ इंडीयाचे खाते तपशील वापरून शुल्काचा भरणा करण्यात यावा.**

१. दि. १० ऑगस्ट, २०२३ नंतर नोंदणी शुल्क भरल्यास वरील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे दंडाच्या रकमेसह नोंदणी शुल्क भरणे आवश्यक राहील.
२. चलनातील सर्व माहिती परीपुर्ण भरुन चलनावर विदयार्थी संख्येची नोंद करणे आवश्यक आहे. तसेच पत्रामध्ये विदयार्थी संख्या नोंदवावी.
३. इ. १० वी इ. १२ वी साठी फेब्रु/मार्च २०२४ च्या परीक्षेकरिता प्राप्त होणा-या नोंदणी शुल्काची पडताळणी ही, आपण मंडळाकडे सादर केलेल्या नियमित विदयार्थ्यांच्या आवेदनपत्रांच्या संख्येवरुन करण्यात येणार आहे. तेव्हा नोंदणी शुल्क भरतांना सदर बाबीची मुख्याध्यापक/प्राचार्यांनी नोंद घ्यावी.
४.नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्क मंडळाकडे पाठवितांना सोबत जोडलेल्या नमुन्यातील प्रपत्रावर माध्यमिक शाळा/क.म.सांकेतिक क्रमांक, इ.१० वी/१२ वी नियमित विदयार्थी संख्या, चलन क्रमांक, दिनांक, एकूण रक्कम व बँकेचे नाव इ.बाबी नमूद कराव्यात.
५. अपरिहार्य कारणास्तव चलनाव्दारे नोंदणी शुल्क जमा करता न झाल्यास राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्राफ्ट किंवा मंडळ कार्यालयात रोखीने शुल्क भरण्यात यावे.
**६. सर्व मान्यताप्राप्त शाळा/क. महाविद्यालय तसेच ज्या शाळांना माध्यमिक/कनिष्ठ महाविद्यालयांचे वर्ग संलग्न असतील अशा माध्यमिक शाळा/कनिष्ठ महा. इ.१० वी/१२ वी साठी स्वतंत्र रु. ५००/- (२ अंकाचे ) शिक्षणसंक्रमण शुल्क वेगवेगळे भरणे अनिवार्य आहे.**

उपरोक्त तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे नोंदणी शुल्क व शिक्षणसंक्रमण शुल्काचे चलन / डी.डी. दिनांक **१० ऑगस्ट २०२३** रोजी वा तत्पुर्वी काढलेला असावा व सदरचे चलन दि. **१० ऑगस्ट २०२३** पर्यंत मंडळ कार्यालयात जमा करावेत. सदर दिनांकानंतरचे चलन व माहितीचा तक्ता दंडात्मक शुल्कासह मंडळ कार्यालयाकडे पाठविण्यात यावा. अन्यथा यासंदर्भात कोणतेही स्मरणपत्र/पत्रव्यवहार न करता मंडळ नियमावली नुसार कारवाई करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(औदुंबर उकिरडे)
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ, पुणे